**वार्षिक योजना सन २०२६-२७**

**राज्यस्तरीय योजनेअंतर्गत फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (२४०६ २१६१) या योजने अंतर्गत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयातील निर्लेखित केलेल्या १७ वाहनाच्या बदली नवीन १७ वाहने खरेदी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक: वाहन-२०२६/प्र.क्र.११५/वने-५**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: १९ जून, २०२६

**संदर्भ:** १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वाहन-१०००/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०.०९.२००१

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वाहन २०१४/प्र.क्र.३६/१४/विनियम दि.२२ ऑगस्ट, २०१४

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग-२ दि.१७ एप्रिल, २०१५

४) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ व क्र. संकीर्ण-२०१६ /प्र.क्र.२१५/उद्योग-४, दि.२४.०८.२०१७

५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२१/प्र.क्र.४८/अर्थ-३, दि.१७.०३.२०२२

६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:वाहन-२०२३/प्र.क्र.०५/फ-५ दि. २६ डिसेंबर, २०२३

७) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वाहन २०२४/प्र.क्र.११/विनियम दि.०२ फेब्रुवारी, २०२४

८) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वाहन २०२५/प्र.क्र.१९/विनियम दि.१७ सप्टेंबर, २०२५

९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-८/वाहन/प्र.क्र.१८(२०२५-२६)/३९९, दि.२९.०५.२०२६

१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-८/वाहन/प्र.क्र.१६(२०२५-२६)/४३०, दि.०२.०६.२०२६

११) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-८/वाहन/प्र.क्र.१६(२०२५-२६)/४५७, दि.०४.०६.२०२६

**प्रस्तावना :**

वन विभागाच्या अधिनस्त विविध कार्यालयासाठी संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयान्वये १४४२ वाहनांचा (कार-१३३, जीप-९२२ व इतर विविध प्रकारची ३८७ वाहने) आढावा मंजूर करण्यात आला आहे.

२. वित्त विभागाच्या उक्त संदर्भ क्र.१ येथील दि.१० सप्टेंबर, २००१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय व इतर कार्यालयांसाठी वाहनांच्या वापरासंबधी धोरण विहित करण्यात आले आहे. तसेच संदर्भ क्र. ८ येथील शासन निर्णय दि.१७ सप्टेंबर, २०२५ अन्वये शासकीय वाहनांचे सुधारीत किंमत मर्यादा धोरण निश्चित करण्यात आले आहे.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अधिपत्याखालील राज्य योजनेअंतर्गत फिरत्या पथकाचे सक्षमिकरण योजनेअंतर्गत वाहन आढावा समितीने मान्यता दिलेल्या वाहनापैकी निर्लेखित करण्यात आलेल्या १७ (१३ कार + ४ जीप) वाहनाच्या बदल्यात त्याच प्रकारातील नवीन १७ वाहने खरेदी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

वन विभागातील वनसंरक्षण व इतर महत्वाची कामे करण्यासाठी जीप, कार, व इतर प्रकारातील विविध वाहने वापरात आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या मापदंडानुसार वाहने विहित कालमर्यादेनंतर निर्लेखित करण्यात आलेल्या वाहनांच्या बदल्यात त्याच प्रकारातील नवीन वाहने घेण्यात येतात. त्यानुषंगाने संदर्भ ९ अन्वये, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयाकरिता राज्य योजनेअंतर्गत फिरत्या पथकाचे सक्षमिकरण योजनेअंतर्गत निर्लेखित केलेल्या १७ (१३ कार + ४ जीप) वाहनाच्या बदल्यात नवीन १७ वाहने खरेदी करण्यास खालील अटीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

१) वित्त विभाग, शासन निर्णय दि.१७.०९.२०२५ अन्वये नमूद केल्यानुसार संबंधित अधिकारी यांना निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहने (वाहनाची किमंत + टेंम्परररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभूत साहित्य इत्यादी अंतर्भूत करुन) खरेदी धोरणाबाबत निश्चित करण्यात आलेल्या वाहन किंमत मर्यादेतच वाहने खरेदी करण्यात यावीत.

२) वाहने खरेदी करतांना उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ व क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२१५ /उद्योग-४, दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयानुसार वाहन खरेदी GeM Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३) निर्लेखित केलेल्या वाहनांचा विभागाच्या वाहन आढाव्यात समावेश आहे, याची खातरजमा नवीन वाहन खरेदी करण्यापूर्वी करणे आवश्यक राहील.

४) निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली यापूर्वी नवीन वाहने खरेदी करण्यात आलेली नाहीत या अटीच्या अधिन राहून, नवीन वाहने खरेदी करण्यात यावीत.

५) वाहने खरेदी करतांना त्या संबधीच्या नेहमीच्या कार्यपध्दती विषयी नियमांचे आणि इतर सर्व निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी तसेच यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर या कार्यालयाची राहील.

६) वाहन अनुज्ञेय असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या वापरातील ज्या प्रकारचे वाहन निर्लेखित करण्यात आले आहे, त्या वाहनाऐवजी संबधित पदासाठी त्याच प्रकारचे वाहन अनुज्ञेय राहील.

७) नवीन वाहन खरेदीनंतर त्यांची नोंद महावाहन संगणक प्रणालीवर नोंदविण्यात यावी.

८) वाहन अनुज्ञेय असणाऱ्या एका अधिकाऱ्याच्या वापरात फक्त एकच वाहन असावे.

९) कोणत्याही परिस्थितीत वाहन चालकांची नवीन पदे निर्माण करण्यात येऊ नयेत.

१०) निर्लेखित केलेल्या १७ (१३ कार + ४ जीप ) वाहनांचा तपशिल **विवरणपत्र-अ** मध्ये दर्शविण्यात आला आहे, त्याच वाहनाच्या बदल्यात नवीन १७ वाहने खरेदी करण्यात यावीत.

२. वाहन खरेदीसाठी लागणाऱ्या निधीबाबत वेगळयाने शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल तद्‌नंतरच वाहन खरेदीची प्रक्रिया राबविण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत, त्यातील अनु. क्र.१९- क, नियम क्र. ६९ व वित्त विभाग शासन निर्णय दि.१७.०९.२०२५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०६१९१२०३०००००१९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

SAHEBRAO NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.06.19 12:03:51 +05'30'

**(साहेबराव घिगे)**
**अवर सचिव (वने), महसूल व वन विभाग**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) अपर मुख्य सचिव (वने), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी)/(अकाष्ठ वनोपज)/माहिती तंत्रज्ञान व धोरण)/ (कार्मिक)/ (संरक्षण)/ वन्यजीव (पूर्व) नागपूर
८) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, छत्रपती संभाजीनगर / पुणे
९) उपवनसंरक्षक (संसाधन उपयोग)/(अकाष्ठ वनोपज)/ (वनसंवर्धन) नागपूर
१०) महालेखापाल १/२ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१३) कार्यासन, व्यय-१०/विनियम, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) कार्यासन वने-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५) अर्थसंकल्प कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६) कार्यासन वने-५ निवड नस्ती, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**शासन निर्णय क्रमांक: वाहन-२०२६/प्र.क्र.११५ /वने-५, दिनांक: १९ जून २०२६ सोबतचे विवरणपत्र**

# विवरणपत्र-अ

वार्षिक योजना सन २०२६-२७

**योजनेचे नांव:-** फिरत्या पथकाचे सक्षमीकरण (२४०६ २१६१)

| अ.क्र. | अधिनस्त कार्यालय | वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम | निर्लेखित वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य | **MH-31-DZ-0020** | **कार** |
| २ | | प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर | **MH-31-DZ-0024** | **कार** |
| ३ | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), नागपूर | **MH-31-DZ-0186** | **कार** |
| ४ | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), नागपूर | **MH-15-AA-7172** | **कार** |
| ५ | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज) नागपूर | **MH-31-CV-118** | **कार** |
| ६ | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), नागपूर | **MH-31-DZ-0021** | **कार** |
| ७ | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण) नागपूर | **MH-31-DZ-0023** | **कार** |
| ८ | | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर | **MH-31-CV-120** | **कार** |
| ९ | | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) नागपूर | **MH-31-CV-112** | **कार** |
| १० | | मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज) नागपूर | **MH-12-AH-8088** | **कार** |
| ११ | | उपवनसंरक्षक (संसाधन उपयोग) नागपूर | **MH-31-DZ-0036** | **कार** |
| १२ | | उपवनसंरक्षक (वनसंवर्धन) नागपूर. | **MH-27-AA-40** | **कार** |
| १३ | प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे | वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद | **MH-20-CU-0032** | **कार** |
| १४ | | सहायक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण, औरंगाबाद | **MH-27-AA-0618** | **जीप** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | | विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, लातूर | **MH-24-D-7867** | **जीप** |
| १६ | | सहायक वनसंरक्षक-१, सामाजिक वनीकरण, सातारा | **MH-11-AB-306** | **जीप** |
| १७ | | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, सांगली-१ | **MH-10-N-650** | **जीप** |

*********************